MHAU060005222019

<u>**रे.दि.मु.नं. ४४/२०१९ मधील निशाणी २० वर आदेश**</u>

१. सदरचा अर्ज प्रतिवादीतर्फे त्यांचेविरुध्द झालेला 'उलटतपास नाही'' आदेश रद्द होवून त्यांना वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे अर्जातील कथन असे आहे की, प्रस्तुत कामी वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर दि. २६.११.२०२१ रोजी प्रतिवादीविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना उलटतपास घेणे आवश्यक व गरजेचे असून सदर दाव्याचा निकाल गुणावगुणावर होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला ''उलटतपास नाही'' आदेश रद्द करुन प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने अमान्य केली आहेत व असे कथन केले आहे की, प्रतिवादी हा जाणीवपुर्वक सदरचे प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रतिवादी यांना पुरेसी संधी देवनही वादी यांचा उलटतपास न घेतल्याने दिनांक २६.११.२०२२ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सबब वादी यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी दि. २३.०३.२०२१ रोजी नि.१३ येथे त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तेव्हापासून प्रकरण वादीचे उलटतपासावर प्रलंबित आहे. दिनांक

२६.११.२०२१ रोजी वादी उलटतपासात हजर असताना प्रतिवादी व प्रतिवादीतर्फे वकिल गैरहजर राहिल्याने दि. २६.११.२०२१ रोजी प्रतिवादीविरुध्द ''उलटतपास नाही'' असा आदेश पारित करण्यात आला आहे. प्रतिवादीने अर्जात नमूद केलेली कथने संयुक्तिक नाहीत, परंतु सदर दावा हा गुणदोषावर निकाली काढण्याकरिता प्रतिवादीला वादीचा उलटतपास घेण्याची संधी देणे योग्य व न्यायोचित होईल. सदर उलटतपास घेण्याकरिता प्रतिवादीने जो विलंब केला आहे, त्या विलंबाकरिता प्रतिवादी वर खर्च लादुण अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो –

## आदेश

१. अर्ज नि. २० खर्च र.रु. २००/– सह मंजूर करण्यात येतो. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना द्यावी.

२. खर्चाची रक्कम भरल्यानंतर, प्रतिवादीविरुध्द नि. २० वर पारित केलेला ''उलटतपास नाही'' आदेश रद्द करण्यात येतो व त्यांना वादीचा उलटतपास घेण्याची संधी देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2022.06.15 11:13:52 +0530

स्थळ :कन्नड. (श्रीमती अ. ई. आवटी)

दिनांक : १४.०६.२०२२. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | R. S. Takalkar |
| Court | : | A. I. Awati<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C, Kannad. |
| Date | : | 14.06.2022 |
| Order signed by the presiding officer on | : | 14.06.2022 |
| Order uploaded on | : | 15.06.2022 |
| Order is digitally signed on | : | 15.06.2022 |

…………………………………………………………………